वाहतुक बदल अधिसुचना

जा.क्र./पोउआ/वाहतुक/नियोजन/ २४२७६४ /२०२३ पिंपरी चिंचवड शहर दिनांक -२९/०६/२०२३

चांदणी चौक या ठिकाणी मागील ०८ महिन्यापासून भारत सरकार, एनएचएआय व एनसीसी यांचे मार्फतीने ब्रिज व रस्त्याचे नूतनीकरणाचे कामकाज चालू असुन चांदणी चौक या ठिकाणी मुख्य गर्डर टाकण्याचे काम करण्यात येणार आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन प्राप्त हरकती व सुचनांचा विचार करून मी काकासाहेब डोळे, पोलीस उप आयुक्त, परि २, अति.कार्य. पोलीस उप-आयूक्त वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन सदरचे काम पुर्ण होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

संबंधीत वाहतुक विभाग

१. मुंबई कडुन येणारी जड वाहतूक मुंबई पुणे एक्सप्रेस वेवर तळेगाव टोलनाका या ठिकाणी व मुंबई पुणे जुना हायवे वर सोमाटणे टोलनाका या ठिकाणी थांबविण्यात येणार आहे.

२. मुंबई पुणे एक्सप्रेसवे व मुंबई पुणे जुना हायवे येथुन येणारी चारचाकी हल्की वाहने ही भुजबळ चौक,राजीव गांधी ब्रिज मार्गे व चांदणी चौक विवा हॉटेल या मार्गाने कात्रजकडे वळविण्यात येणार आहे.

३. मुंबई पुणे एक्सप्रेसवे, मुंबई पुणे जुना हायवे व किवळे ब्रिज ते राधा चौक या दरम्यान येणारी जड वाहने ही भुजबळ चौक, राजीव गांधी ब्रिज मार्गे जावु देणे अशा प्रकारे वाहतूकीचे नियोजन करण्यात आले आहे.

वरील आदेशाची दिनांक ०४/०७/२०२३ पासुन १५/०७/२०२३ या कालावधीत रात्री ००.३० (सोमवारी रात्री १२.३० पासुन ) ते पहाटे ०३.३० वाजेपर्यंत वैद्य राहील.

तरी नागरीकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा, वरील प्रमाणे वाहतुक बदलाबाबत वॉर्डन व वाहतुक कर्मचारी यांना सहकार्य करावे असे अवाहन पिंपरी चिंचवड शहर, वाहतुक शाखा यांचे मार्फतीने करण्यात येत आहे.

(काकासाहेब डोळे)
पोलीस उप आयुक्त,परि २
अति.कार्य. वाहतूक पिंपरी चिंचवड

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,
नविन मध्यवर्ती इमारत, पुणे – ०१

प्रत:-

१)पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विंनती करावी.

२) सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी चिंचवड शहर.

३) पोलीस निरीक्षक, संबंधीत वाहतूक विभाग पिंपरी चिंचवड शहर.

२/- सदर ठिकाणी वरील वाहतूक वळविणारे फलक बसविणेची कार्यवाही करावी.